**Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies,**
*Online ISSN 2278-8808, SJIF 2021 = 7.380, www.srjis.com*
*PEER REVIEWED & REFEREED JOURNAL, SEPT-OCT, 2022, VOL- 10/73*
*https://doi.org/10.21922/srjis.v10i73.11655*

# पिंपरी-चिंचवड परिसरातील बालगुन्हेगारी : एक सामाजिक व आर्थिक समस्या

**आशा यशवंत सकुंडे[१] & संगिता साळवे[२], Ph. D.**

*[१]संशोधक, संशोधक विद्यार्थीनी, प्रा.रामकृष्ण मोरे महाविद्यालय, आकुर्डी, पुणे.*

*[२]मार्गदर्शक, विभाग प्रमुख व संशोधक मार्गदर्शक, डॉ. अरविंद तेलंग महाविद्यालय, निगडी, पुणे.*

**Paper Received On:** 25 OCTOBER 2022
**Peer Reviewed On:** 31 OCTOBER 2022
**Published On:** 01 NOVEMBER 2022

***Abstract***

*बालगुन्हेगारी भारतात मोठ्या शहरांमध्ये मोठ्या प्रमाणात वाढत आहे. मद्रास, दिल्ली, कलकत्ता, लखनऊ, बंगलोर, या शहरात तसेच महाराष्ट्रात, मुंबई, पुणे, पिंपरी-चिंचवड, सोलापूर, नागपूर, मनमाड या ठिकाणी तसेच रेल्वे जंक्शनची गावे, औद्योगिक वस्त्या व्यापाराची उलाढाल चालणारी ठिकाणे अशा ठिकाणी बालगुन्हेगारीचे प्रमाण मोठ्या प्रमाणात आढळते. बालगुन्हेगारी हे आजारी समाजाचे लक्षण आहे. पिंपरी-चिंचवड शहरातील वाढती गर्दी, बकालवस्त्या, जुगार, तस्करी, मद्यपान यामुळे बालगुन्हेगारी वाढत आहे. औद्योगिकीकरण, नागरीकरण यामुळे मोठ्या प्रमाणात बालगुन्हेगारी वाढत आहे. पिंपरीचिंचवड शहरातसुद्धा बालगुन्हेगारी गंभीर स्वरूप धारण करीत आहे. मानसशास्त्रज्ञ व शरीरशास्त्रज्ञ यांच्या मते, सात वर्षाच्या आतील मूल कोणतेही कृत्य समजून करीत नाही. एखाद्ये कृत्य त्याच्या हातून घडून गेले तरी त्याने जाणीवपूर्वक केलेले नसते. म्हणूनच बालगुन्हेगाराच्या वयाची किमान मर्यादा सर्व देशात (फिनलंडचा अपवाद वगळता) सात ते आठ वर्षे आहे. कमाल मर्यादा विविध देशातच नव्हे तर विविध राज्यांतही वेगवेगळी आहे.*

*अमेरिका व युरोपमध्ये १६ ते २५, आशियामध्ये १५ ते २० तसेच युरोप, आशिया व अमेरिका या देशातील बऱ्याच राज्यांमध्ये १८ हे कमाल वय धरले जाते. भारतात १९६० च्या मुलांच्या कायद्याप्रमाणे हे कमाल वय मुलांसाठी १६ व मुलींसाठी १८ आहे.[१]*

***Scholarly Research Journal's** is licensed Based on a work at **www.srjis.com***

## प्रस्तावना

आजचा बालक देशाचा व भावी पिढीचा आधारस्तंभ आहे. त्याला सक्षम बनविणे हे समाजातील प्रत्येक घटकांची जबाबदारीच नाही तर आद्यकर्तव्य आहे. मानवाला जीवन जगण्याचा, स्वातंत्र्य, अन्याय, अत्याचार, पिळवणूक यापासून संरक्षणाचा आणि मुक्तीचा अधिकार भारतीय घटनेने व मानवी हक्काच्या

जाहिरनाम्यानुसार प्राप्त झालेले आहेत हे अधिकार बालकांनाही आपोआपच प्राप्त झालेले आहेत. पिंपरी-चिंचवड परिसरात अनेक अनात, निराधार, हरवलेली बालके, भिक मागणारी, मजूरीला बळी गेलेली, अवैध कृत्यासाठी व लैंगिक दुरूपयोगाला बळी पडलेली बालके आढळून येतात.

व्याख्या : डॉ. सेठना : ''एखाद्या देशातील कायद्याने निश्चित केलेल्या वयापेक्षा कमी वय असलेल्या बालकाने किंवा युवकाने केलेले कायद्याविरोधी वर्तन म्हणजे बालगुन्हेगारी होय.''[२]

महाराष्ट्र हे बालगुन्हेगारीच्या बाबतीत दुसऱ्या क्रमांकावर आहे. तर बालगुन्हेगारीच्या बाबतीत मध्यप्रदेश राज्याचा प्रथम क्रमांक लागतो. महाराष्ट्र हे औद्यागिक विकासात आघाडीवर असलेले राज्य असून बालगुन्हेगारीतही अग्रेसर असल्याची धक्कादायक माहिती समोर आलेली आहे. बालगुन्हेगारी आणि देशाचा आर्थिक विकास यामध्ये काही संबंध आहे का? याचा विचार करता असे लक्षात येते की, देशातील बालगुन्हेगारीचे प्रमाण असेच सातत्याने वाढत राहिले तर त्याचा देशाच्या आर्थिक विकासावर नक्कीच परिणाम होऊन दरडोई उत्पन्नात घट होत असते.

**संशोधनाची निवड**

सांस्कृतिक राजधानी, विद्येचे माहेर अशी बिरूदे मिरविणाऱ्या पुण्याला आता बालगुन्हेगारांचे शहर अशी नवी ओळख निर्माण झाली आहे. गेल्या सहा वर्षापासून पुणे व पिंपरी-चिंचवड शहरातील बालगुन्हेगारीने मुंबईसह सर्वच राज्यातील शहरांना मागे टाकले आहे. २००५ ते २०१० या सहा वर्षात पुणे व पिंपरी-चिंचवड शहरात ४ हजार ३०० बालगुन्हेगारांची नोंद झालेली आहे. २००५ ते २००९ या वर्षात ९० खून, ७४ हाफ मर्डर, ४४२ प्राणघातक हल्ले, २३ बलात्कार, २७ जणांचे अपहरण आणि दरोडे, चोरी, घरफोडी यांच्या १४२४ गुन्ह्यांची नोंद झालेली आहे. बालगुन्हेगारांसाठी ज्या योजना आहेत त्या शासकीय योजनांचा अभ्यास करणे, आर्थिक व सामाजिक परिस्थिती कशी आहे, बालगुन्हेगारीचे प्रमाण का वाढत आहे, इत्यादी बाबींचा आढावा घेण्यासाठी हा विषय संशोधनासाठी जाणीवपूर्वक निवडला असून अभ्यास विषयाचे शिर्षक ''पिंपरी-चिंचवड परिसरातील बालगुन्हेगारांच्या कुटुंबाच्या आर्थिक व सामाजिक समस्यांचा अभ्यास'' असे आहे.

*Copyright © 2022, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

**संशोधनाची उद्दिष्ट्ये**

१) बालगुन्हेगार मुलांच्या कुटुंबांच्या आर्थिक परिस्थितीचा आढावा घेणे.

२) बालगुन्हेगार निर्माण होण्यामागे कोणती आर्थिक आणि सामाजिक कारणे आहेत याचा अभ्यास करणे.

३) बालगुन्हेगारी कमी करण्यासाठी राबवण्यात येणाऱ्या शासकीय योजनांचा अभ्यास करणे.

**गृहितके**

१) जे बालगुन्हेगार आहेत, त्यांची आर्थिक परिस्थिती खूपच कमकुवत आहे.

२) लहान मुलांच्या हातून गंभीर स्वरुपाचे गुन्हे घडलेले आहेत.

३) बालगुन्हेगारांच्या कुटुंबातील सदस्यांना सामाजिक समस्यांचा सामोरे जावे लागते.

**संशोधन पद्धती**

संशोधनासाठी निवडलेल्या घटकांचे अध्ययन करताना जेव्हा विशिष्ट घटकांची पदसंख्या खूपच अधिक असते तेव्हा प्रत्येकाचा अभ्यास करणे शक्य नसते. तेव्हा अशा सर्व चलांमधून त्याविशिष्ट चलांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या काही निवडक चलांची निवड करावी लागते व त्या निवडलेल्या चलांचा अभ्यास करूनच त्याआधारे आलेले निष्कर्ष संपूर्ण घटकाला किंवा त्या गटाला लागू केले जातात. अशा पद्धतीला नमुना निवड पद्धत असे म्हणतात.[३] प्राथमिक सामग्री : संशोधनासाठी प्राथमिक व दुय्यम स्त्रोतांचा वापर करण्यात आलेला आहे. पिंपरीचिंचवड शहरामध्ये पिंपरी पोलीस स्टेशन यांचा समावेश होतो. सदर संशोधनासाठी पिंपरीचिंचवड परिसरात येणाऱ्या पिंपरी-चिंचवड, निगडी, भोसरी या क्षेत्रीय बालगुन्हेगारांचा अभ्यास करण्यात आलेला आहे. सदर संशोधनासाठी पिंपरी-चिंचवड परिसरातील ४०० बालगुन्हेगारांची निवड करण्यात आलेली आहे.


*Copyright © 2022, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

**तक्ता क्र. १.१ महाराष्ट्रातील बालगुन्हेगारांची संख्या (२०२२)**

| अ. क्र. | राज्य | बालगुन्हेगारांची संख्या |
|---|---|---|
| १ | मध्यप्रदेश | ५६८४ |
| २ | महाराष्ट्र | ४५५४ |
| ३ | राजस्थान | २७५७ |
| ४ | तामिळनाडू | ४१८ |
| ५ | कर्नाटक | ३७९ |
| ६ | ओडिसा | ३५३ |
| ७ | सिक्कीम | ०० |
| ८ | नागालँड | ०१ |
| ९ | मिझोरम | २ |
| १० | मेघालय | २ |
| ११ | मणिपूर | ६ |
| १२ | गोवा | ९ |

*संदर्भ : लोकसत्ता न्यूजपेपर, अनिल कांबळे, दि.११.सप्टेंबर २०२२.*[४]

**आलेख क्र. १.१ महाराष्ट्रातील बालगुन्हेगारांची संख्या (२०२२)**




**संदर्भ : तक्ता क्र. १.१**

महाराष्ट्रात २०२२ च्या आकडेवारीनसार बालगुन्हेगारांची संख्या सर्वात जास्त मध्यप्रदेश राज्यात (५६८४) एवढी आढळते. त्यानंतर महाराष्ट्रात ४५५४ एवढी आहे. राजस्थान राज्यात २७५७, तमिळनाडू ४१८, कर्नाटक ३७९, ओडिसा ३५३, या राज्यांत बालगुन्हेगारांची संख्या आढळते. महाराष्ट्रातील पिंपरी-

*Copyright © 2022, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

चिंचवड शहरात बालगुन्हेगारांची संख्या मोठ्या प्रमाणात आढळते. पिंपरी-चिंचवड परिसरातील बालगुन्हेगरांच्या मुलांच्या कुटुंबांची आर्थिक परिस्थिती कशी आहे? बालगुन्हेगार होण्यामागे कोणती आर्थिक व सामाजिक कारणे आहेत? बालगुन्हेगारी कमी करण्यासाठी शासकीय योजना कोणत्या? हे जाणून घेण्यासाठी पिंपरीचिंचवड परिसरातील बालगुन्हेगारांच्या कुटुंबांचा आर्थिक व सामाजिक समस्यांचा अभ्यास हा विषय संशोधनासाठी निवडला आहे.

**दुय्यम सामग्री**

दुय्यम सामग्रीमध्ये विविध लेखा, वार्षिक अहवाल, संदर्भ ग्रंथ, शोधप्रबंध, विविध मासिके, संशोधन लेख, दैनिक वृत्तपत्र, संपादित लेख, आर्थिक व सामाजिक अहवाल यांचा वापर करण्यात आलेला आहे.

**बालगुन्हेगार कायदा व वास्तव**

२०१४ या वर्षी केंद्रीय महिला व बालकल्याण विभागाने बालगुन्हेगारी कायदा २००० मध्ये दुरूस्त्या सुचविणारे विधेयक सादर केलेले आहे. या दुरूस्तीमधील सर्वांत महत्त्वाची दुरूस्ती म्हणजे बालगुन्हेगारांचे वय १८ वर्षावरून १६ वर्षावर आणावयाचे होते. त्यामुळे १२ ऑगस्ट २०१४ रोजी विधेयकाचा मसुदा लोकसभेने बहुमताने मंजूर केला. मानवी हक्काचे संरक्षण हे २००० च्या कायद्याचे मुख्य उद्दिष्ट्ये होते. बालगुन्हेगाराला शिक्षा न देता त्यामागची कारणे समजून घेऊन त्यास सुधारण्याची संधी देण्याचे या कायद्याचे उद्दिष्ट्ये होते. या कायद्याअंतर्गत १८ वर्षाखालील मुलाने/मुलीने जर एखादा गुन्हा केला तर त्यास इतर गुन्ह्यांप्रमाणे शिक्षा न देता त्याची रवानगी बालसुधारणा गृहात केली जायची. तसेच बालगुन्हेगारांचे पुर्नवसन त्यांना काऊसलिंग करणे, त्यांच्या पालकांकडून दंडाचे पैसे भरायला लावणे किंवा मुलांना गृहात ठेवणे हे बालगुन्हेगार सुधारणा मंडळाचे प्रमुख काम होते. बालगुन्हेगारी नवीन कायद्यानुसार वर्ष १६ ते १८ दरम्यानच्या मुला-मुलीने गंभीर स्वरुपाचा म्हणजे खून, बलात्कार, ॲसिड हल्ला यासारखा गुन्हा केला असेल त्यावर प्रौढाप्रमाणेच खटला चालवून दोषी आढळल्यास शिक्षा दिली जाईल.

सिंगापूरमध्ये बालगुन्हेगारांचे वय १६ समजले जाते. या ठिकाणी पालकांकडून हमीपत्र लिहून घेतले जाते. अमेरिकेमध्ये काही राज्यांमध्ये बालगुन्हेगारांचे वय १८ तर इंग्लंडमध्ये १०, फ्रान्समध्ये १२

Copyright © 2022, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies

असे बालगुन्हेगारांचे वय समजले जाते. १३ ते १६ या वयोगटातील गुन्हेगारांना निम्मी शिक्षा तर १६ ते १८ वयोगटातील गुन्हेगारांना तुरूंगवासाची शिक्षा महाराष्ट्रात दिली जाते.[५] संदर्भ साहित्याचा आढावा :

**१) बल्लोरे एस. के. आणि मोरताटे आर. जी. (२०१३)**

यांनी बालगुन्हेगारी आणि बालहक्क एक दृष्टीक्षेप या संशोधन पेपर मध्ये बालगुन्हेगरीचे वर्णन केलेले आहे. बालकामगाराची प्रथा बालकांच्या सर्वच मुलभूत हक्कांना हिरावून घेणारी समस्या बनवली आहे. ही प्रथा थांबविण्यासाठी बालकांच्या सर्वांगीण विकास आणि संरक्षणाच्या हक्कावर मर्यादा घालणाऱ्या विरूद्ध दंडात्मक कार्यवाही करण्यात यावी. बालकल्याण निधीची उभारणी करून बालकांना योग्य त्या अधिकाऱ्यांची जोपासना होईल. अशा उपाययोजना करणे
आवश्यक असल्याचे या लेखात संशोधकाने म्हटले आहे.[६]

**२) कंधारकर हनुमंत (२०१९)**

मराठवाड्यातील बालगुन्हेगारीतील बालकांच्या हक्क व संवर्धनामध्ये बालगृहांची भूमिका या संशोधन पेपरमध्ये बालकांना बालगुन्हेगारीमध्ये कोणत्या समस्या व अडचणींना जावे लागते. बालगुन्हेगारांचे कोणते हक्क आहेत. बालगुन्हेगारांना कोणत्या शिक्षांना सामोरे जावे लागते यांचे सविस्तर वर्णन करण्यात आलेले आहे. त्यांनी आपल्या संशोधन पेपरमध्ये मराठवाड्यातील बालगुन्हेगारीवर प्रकाश टाकलेला आहे. त्यांनी आपल्या लेखात जुगार, तस्करी, मद्यपान, वाढती गर्दी, यामुळे बालगुन्हेगारांचे प्रमाण वाढत आहे असे सांगितले आहे. सात वर्षाचा मुलगा कोणतेही कृत्य जाणूनबुजून करीत नाही. एखादे कृत्य त्यांच्या हातून घडून गेले तर त्याने जाणीवपूर्वक केलेले नसते असे त्यांनी म्हटले आहे. त्यांनी आपल्या लेखात बालगुन्हेगारांचे प्रमाण शहरात जास्त आहे त्यामुळे शहरांवर जास्त लक्ष केंद्रीत केले पाहिजे असे त्यांनी आपल्या लेखात उपाययोजना सांगितली आहे.[७]

**३) लखदिवे सरोज (२०१९)**

बालगुन्हेगारी एक सामाजिक समस्या या संशोधन पेपर लेखात लेखकाने मूल हे ओल्या मातीचा गोळा असतो. जसे घडविले तसे घडते असे म्हटले आहे. शाळा, ट्युशन, विविध क्लासेस यामुळे मुले जास्तीत जास्त वेळ बाहेर राहतात. बाहेरच्या वातावरणाचा मुलांवर प्रभाव पडत असतो. उठता बसता

Copyright © 2022, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies

संस्कार करणारे आईवडील त्यांना नकोसे वाटतात. अनुवांशिकता, मेंदूविकृती, विकृत कुटुंबे, व्यक्तिमत्व घटक अशी अनेक कारणे बालगुन्हेगारीची त्यांनी सांगितली आहेत.[८]

**४) पाटील के. बी. (२०१६)**

भारतातील बालगुन्हेगारी : एक सामाजिक समस्या या संशोधन लेखात संशोधकाने भारतातील विविध सामाजिक समस्यांबरोबर आज बालगुन्हेगारीच्या समस्येने सर्वांचे लक्ष वेधले आहे. सामाजिक विघटनाच्या प्रक्रियेबरोबरच बालगुन्हेरीची समस्या वाढत चाललेली आहे. सध्याच्या परिस्थितीत मुलांमध्ये वाढत चाललेली हिंसा, उद्धटपणा आणि बालगुन्हेगारी प्रवृत्ती रोखण्यात महत्त्वाचे काम पालकांचे आहे. आपल्या पातळीवर प्रयत्न करून देखील मुलांमुलींच्या वागण्यात बदलहोत नाही असे वाटल्यास समुपदेशन हाच त्यावर सर्वांत चांगला उपाय आहे. मुलांशी होणारा संवाद हाच त्यावर उपाय आहे असे त्यांनी आपल्या लेखात म्हटले आहे.[९]

**५) बाविस्कर महेश (२०१२)**

समस्या जीवघेण्या बालगुन्हेगारीची या लेखात मुलांच्या हाती पाटी-पेन्सिल असण्याळेवजी ब्लेड-चाकू यावा इतकी गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे, याला म्हणावे तरी काय? शहरी भागात मुलांसाठी क्वचितच दिला जाणारा वेळ, पालक-मुलांमध्ये कमी झालेला संवाद, पराकोटीची विषमता यामुळे बालकांच्या म्हटले आहे. मुंबई-पुण्यासारख्या मोठ्या शहरामध्ये असणारे पेव आता या प्रमुख शहरांबरोबरच हळूहळू आजूबाजूच्या शहरांमध्ये पसरूल लागले आहे. आणखी एक गंभीर बाब म्हणजे मुंबई मोठ्या बालगुन्हेगरीचे प्रमाण वाढत आहे. बालगुन्हेगरी कालही होतीच, पण आज तिचे सामान्यीकरण होताना 'थ्रिल' हा घटक महत्त्वाचा ठरतो. आर्थिक आबाळ, पालकांचे दुर्लक्ष, व्यसन आणि थ्रिल अनुभवायची मानसिकता यामुळे अनेक मुले गुन्हेगारीच्या परत न येणाऱ्या वाटेवरचा प्रवास सुरू करतात. बालगुन्हेगारी रोखण्यासाठी पालकांनी मुलांकडे लक्ष ठेवणे गरजेचे आहे. अशी उपाययोजना त्यांनी आपल्या लेखात सांगितली आहे.[१०]

*Copyright © 2022, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

**बालगुन्हेगारीची कारणे**

१) वाईट शेजारी : बालगुन्हेगारांचा कुटुंब, वस्ती आणि शेजारी यांच्याशी संबंध येतो. शेजार जर चांगला असेल तर त्याचा परिणाम चांगला होतो. म्हणूनच चांगला शेजारी भेटायला भाग्य लागते. शेजारी जर वाईट प्रवृत्तींचा असेल तर बालगुन्हेगारी वाढते.

२) शहरीकरण : शहरीकरणामुळे गलिच्छ वस्त्या निर्माण होतात. गरीबी, दारिद्र्य,

मार्गदर्शनाचा अभाव यामुळे ही मुले असभ्य वर्तन करतात. शॉ आणि मॅके यांच्या मतानुसार बालक कोणत्या समुदायात राहतो यावरून त्याच्या वर्तनाची कल्पना येते.

३) चित्रपट व अश्लील साहित्य : ब्लूमर आणि लॉसर यांनी चित्रपठ आणि बालगुन्हेगारी यांचा घनिष्ठ संबंध असल्याचे पटवून दिले आहे. चित्रपटातून मुलांना अनुभवास न येणाऱ्या गोष्टींचे दर्शन घडते व त्या गोष्टी या मुलांना कराव्याशा वाटतात, त्यातून गुन्हेगारी वाढते.

वरील कारणांबरोबरच पालकांचे अतिदारिद्र्य, मानसिक स्वास्थ्य, सावत्र आई-वडील अशा अनेक कारणांमुळे बालगुन्हेगारीचे प्रमाण वाढते.

४) तिरस्कृत, उपेक्षित बालक : कुटुंबात मुलांच्या उपेक्षेची अनेक कारणे आहेत. कुटुंबातील माता-पिता तणाव, सावत्र आई-वडील त्यामुळे मुलांना प्रेम-समाधान, सुरक्षा प्राप्त होत नाही. अनैतिक मुलाकडे त्यांचे कुटुंब आणि समाजसुद्धा घृणास्पद दृषीने पाहतो. सावत्रपणा, माताविषयीची मारहाण, कुवर्तनाने मुले घरातून पळून जातात. मुली वेश्या होतात, मुलांच्या आवश्यक गरजा, सुरक्षितता, मानसिक गरजा पूतर्तअभावी बागुन्हेगार ठरतात.

५) कुटुंबातील व्यसनाधिनता : कुटुंबात मादक पदार्थांची सवय असेल तर बालगुन्हेगारीस सहाय्यभूत घटक ठरतो. कुटुंबामुळे मुलेही मद्यमान करतात. व्यसनी पती-पत्नी मुलांसोबत निष्ठूर वागतात. पित्याच्या व्यसनामुळे कुटुंबाची आर्थिक स्थिती खालावते त्यामुळे बालगुन्हेगारी वाढते.

६) कुटुंबाची आर्थिक स्थिती : कुटुंबाच्या आर्थिक परिस्थितीमुळे मुलांचे निट संगोपन होत नाही. ८० टक्के बालगुन्हेगार अल्पउत्पन्नातील असतात. ७० टक्के बालगुन्हेगार बकाल वस्तीत असतात. दारिद्र्यामुळे मुलांच्या मुलभूत गरजांची पूर्तता होत नाही. त्यामुळे मुले बालगुन्हेगारीकडे वळतात.

*Copyright © 2022, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

७) शालेय वातावरण : बालगुन्हेगारीवर प्रभाव टाकणारा शाळा हा प्रमुख घटक आहे. शाळेतून पळून जाणे, वाईट संगत, शिक्षकांकडून कठोर शिक्षा, विषयाची आवड नसणे, न पेलणारा अभ्यासक्रम, कुसंगतीने बालके चोरी, लैंगीक गुन्हे करतात. त्यामुळे या शिक्षण स्पर्धेत टिकू न शकणारी मुले बालगुन्हेगार होतात.

**बालगुन्हेगारीवर उपाययोजना**

१) प्रत्येक शाळेत पालक-शिक्षकांची संयुक्त मंडळे स्थापन करून शाळेतून पळून जाणाऱ्या मुलांची नोंद ठेवण्यात यावी.

२) बालगुन्हेगारीचे प्रमाण शहरात जास्त आहे. त्यामुळे शहरांवर जास्त लक्ष केंद्रीत करणे.

३) रिकाम्या वेळात मुलांना खेळ, कला, नाट्य यांचा विकास करून घेण्यात यावा. ४) बालगुन्हेगार मार्गदर्शन केंद्र व बालगुन्हेगार मनोरंजन केंद्र यांच्या नावाखाली सामाजिक कार्यकर्ते, महाविद्यालयीन मंडळे यांनी एकत्र येऊन कार्य केले पाहिजे.

५) शारीरिक स्वास्थ्य, जिव्हाळा, आपुलकी, कौतुक न मिळाल्यामुळे त्यांच्या व्यक्तिमत्व विकासात काही दोष निर्माण होतात त्यांचा शोध घेणे.

६) आईवडिलांच्या अवास्तव अपेक्षांच्या दुष्परिणाम व त्यातून मानसिक विकृती तयार होते यांचा शोध घेणे.

**सारांश**

कौटुंबिक आर्थिक परिस्थिती, आजूबाजूचा परिसर, अपयश, वाईट संगत, व्यसनाधिनता व विवंचनेमुळे समाजाबद्दल तीव्र राग निर्माण झाल्याने बालगुन्हेगार निर्माण होतात. प्रामुख्याने हलाखीची आर्थिक परिस्थिती व असुरक्षित वातावरण यामुळे मुलांच्या मनात समाजाविषयी शत्रुत्वाची भावना निर्माण होते. २० व्या शतकात औद्यागिकीकरण व नागरीकरणाचा बराचसा प्रभाव हा सामान्य लोकांवर तसेच बालकांवर पडलेला दिसतो. चांगले आयुष्य जगण्यासाठी चैनीच्या वाढत्या गरजा पूर्ण करण्यासाठी, झटपट श्रीमंत बनण्याचा हव्यास, औद्यागिकीकरणामुळे प्रगत समाजाशी संपर्क येऊन त्यांच्यासारखे जीवनमान जगण्याची सामान्यांची खटपट, विलासी वृत्ती यामुळे बालके वाईट मार्गाला जाताना दिसतात.

*Copyright © 2022, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

## संदर्भ सूची

*Attar A. D., Juvenile Delinquency, Bombay, 1964.*
*के. बी. पाटील, भारतातील बालगुन्हेगारी : एक सामाजिक समस्या, संशोधन रिसर्च पेपर, दि. फेब्रुवारी २०१४, पेज नं. १ ते ४.*
*कुलकर्णी अनिल, गायकवाड आमण्ड, देशपांडे मुकुंद, लहाने नंदा, व्यावसायिक पद्धती, सक्सेस पब्लिकेशन, प्रथमावृथ्ती, २००९, पृ.क्र. १,२,१५.*
*लोकसत्ता न्यूजपेपर, अनिल कांबळे, दि. ११ सप्टेंबर २०२२.*
*वेबसाईट : http://oldgrt.lbp.world.*
*बल्लोरे एस. के. आणि मोरताटे आर. जी., बालगुन्हेगारी आणि बालहक्क, संशोधन पेपर, २०१३, पृ. क्र. १४.*
*कंधारकर हनुमंत, मराठवाड्यातील बालगुन्हेगारीतील बालकांच्या हक्क व संवर्धनामध्ये बालगृहांची भूमिका, संशोधन पेपर, २०१९.*
*लखदिवे सरोदे, बालगुन्हेगारी एक सामाजिक समस्या, संशोधन शिल्प, संशोधन पेपर, ISSN No. 2394-8426, दि.जानेवारी २०१९, पृ.क्र.२० ते २२.*
*पाटील के. बी., भारतातील बालगुन्हेगारी : एक सामाजिक समस्या, Golder*
*Research, Thoughts, Journal, Val. No. 5, ISSN -2231-5063, दि.फेब्रुवारी २०१६, पृ. क्र. १ ते ४.*
*बाविस्कर महेश, समस्या जीवघेण्या बालगुन्हेगारीची प्रहार मासिक, दि. ९ डिसेंबर, २०१९, पृ.क्र. ५ ते १०.*

*Copyright © 2022, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*